सकाळ पु.पा.४.

# मृत्यूनंतरचा प्रवास यातनादायी

## वसई-विरार शहरात स्मशानभूमीची दुरवस्था; नागरिकांत तीव्र नाराजी


वसई, ता. ३ (बातमीदार) : वसई-विरार शहरातील बहुतांश स्मशानभूमींची दुरवस्था झाली आहे. येथे ज्या सुविधा उपलब्ध असायला हव्यात त्या नसल्याने अखेरचा प्रवास यातनादायी ठरत आहे. यामुळे नागरिक नाराजी व्यक्त करत असून स्मशानातही मरणयातना भोगत आहेत. पालिकेने नागरिकांची गैरसोई दूर व्हावी यासाठी लवकरात लवकर उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

वसई-विरार शहराची लोकसंख्या २५ लाखांहून अधिक आहे. नालासोपारा, विरार, वसई आणि नायगाव हद्दीत एकूण १०० हून अधिक स्मशानभूमी आहेत. या स्मशानभूमींची देखभाल, दुरुस्तीसह इतर कामे करता यावी म्हणून दोन कोटी इतकी आर्थिक तरतूद शहरातील स्मशानभूमीकरिता प्रशासनाकडून करण्यात आली आहे. नऊ प्रभागांत असलेल्या या स्मशानभूमींतील सुविधांसाठी पालिका कोट्यवधी रुपये खर्च करते, पण त्यांच्या देखभालीचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. त्यामुळे या असुविधांचा त्रास मात्र मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना होत आहे. महापालिकेच्या स्मशानभूमी विभागाने याकडे लक्ष घालून या समस्या सोडवण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

अनेक ठिकाणी स्मशानभूमीच्या भिंती तुटलेल्या आहेत, तर काही ठिकाणी पत्रे गायब, तर कुठे अंत्यविधीसाठी जाणारा रस्तासुद्धा व्यवस्थित नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

विरार पूर्वेकडील फूलपाडा, पापाखिंड येथील स्मशानभूमीत लाकडे उपलब्ध नाहीत, तसेच तेथे अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. याचबरोबर वाढलेली झाडी, स्वच्छतागृह सुविधांचा अभाव, अंत्यविधी जागा, नातेवाईकांना बसण्यासाठी आसनाची व्यवस्था नाही. विरार पश्चिम, तसेच वसई येथील वासळई, आगाशी, नाळे येथील स्मशानभूमीत सुविधांचा बोजवारा उडाला आहे.

वसई-विरारमध्ये मृत्यूनंतरदेखील त्रास सहन करावा लागत आहे. स्मशानात सुविधांचा बोजवारा उडाला असून त्यामुळे नातेवाईकांना गैरसोय होत आहे. याबाबत आयुक्तांशी चर्चा केली. आढावा बैठक घेण्याचे सांगण्यात आले. महापालिकेने निर्णय घेऊन सुविधा उपलब्ध कराव्यात, अशी मागणी माजी स्थायी सभापती सुदेश चौधरी यांनी केली आहे.



**वसई :** शहरातील स्मशानभूमीची दुरवस्था झाली आहे.

### भटक्या कुत्र्यांचा वावर

शहरात आलेल्या स्मशानभूमीत रोज स्वच्छता होणे गरजेचे आहे. अंत्यविधी कार्यासाठी अस्थी स्मशानभूमीत जाऊन आणावी लागते. मात्र स्मशानभूमी बंदिस्त नसल्याने भटक्या श्वानांचा वावर असतो. त्याचा त्रास मृतांच्या नातेवाईकांना होत आहे. तसेच महापालिकेकडून सुविधा मिळत आहे की नाही याची चाचपणी वारंवार होणे गरजेचे आहे. मात्र तसे होताना दिसत नाही, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

वसई-विरार शहरातील स्मशानभूमीच्या परिस्थितीबाबत संबंधित विभागाची आढावा बैठक घेण्यात आली आहे. त्यानुसार ज्याठिकाणी गैरसोय आहे, तिथे तात्काळ दुरुस्ती व सुविधा पुरविण्यात येतील.

**- अनिल कुमार पवार,** आयुक्त, वसई-विरार महापालिका

सकाळ पा-नं.३.

#टिकलीचाआग्रहनकोच ट्रेंड करत संताप

# संभाजी भिडेंचा समाज माध्यमावर निषेध

मुंबई, ता. ३ : 'कुंकू लाव, तरच बोलेन' अशा वादग्रस्त विधानामुळे चर्चेत आलेल्या शिवप्रतिष्ठान संघटनेचे प्रमुख संभाजी भिडे यांच्याविरोधात समाज माध्यमांवर निषेध व्यक्त करण्यात आला. #टिकलीचाआग्रहनकोच या हॅशटॅग अंतर्गत अनेकांनी भिडे यांच्या वक्तव्याचा निषेध केला. यामध्ये अभिनेत्री उर्मिला मातोंडकर, काँग्रेस नेत्या चारूशीला टोकस, मनसेच्या नेत्या शालिनी ठाकरे यांनी भिडे यांचा समाचार घेतला.

**» चॉईस ज्याचा त्याचा!**

समाजातील अनेक मान्यवर, पत्रकारांनीही समाज माध्यमांवर व्यक्त होत भिडे यांचा निषेध केला आहे. 'टिकली न लावणारी बाई वाईट नाही, हे सिद्ध करायला तिचं कर्तृत्त्व कशाला लिहायचं, ती बाई पार रिकामटेकडी असेना का, टिकली लावणं न लावणं त्या बाईचा चॉईस. जसा मिशा ठेवणं हा त्या भिडेचा किंवा पुरूषाचा चॉईस आहे', अशा शब्दात थेट खडसावले.

'साम टीव्ही'च्या प्रतिनिधी रुपाली बडवे यांनी बुधवारी मंत्रालयात आलेल्या संभाजी भिडे यांची प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न केला असता, 'तू आधी कुंकू लाव, मग मी तुझ्याशी बोलेन' असे वादग्रस्त विधान केले. या विधानाचा सर्वच स्तरातून निषेध केला जात आहे. अभिनेत्री उर्मिला मातोंडकर यांनी 'सावित्री-जिजाऊच्या लेकी... लेकी महाराष्ट्राच्या... महान भारतमातेच्या... आम्ही सोबत आहोत', असे ट्विट करत रुपाली यांना पाठिंबा दिला.

मनसे नेत्या शालिनी ठाकरे यांनीही भूमिका मांडली. मी कुंकू-टिकली लावते. गेल्या काही वर्षांपासून तर मोठे कुंकू लावते. कारण मला आवडते; पण उद्या मला कुणी कुंकू किंवा टिकली लावण्याची सक्ती केली, तर मी लावणार नाही! असे ट्विट त्यांनी केले. काँग्रेस नेत्या चारुशिला टोकस यांनीही ट्विटद्वारे भिडे यांच्यावर जोरदार टीका केली. त्यांच्यासारखे विकृत जोपर्यंत या देशातील हिंदू धर्मातील बुरसटलेल्या प्रथा-परंपरांचे उदात्तीकरण करत राहतील, अशा शब्दात भिडे यांचा समाचार घेतला.

पुण्यनगरी ५-पा-९.

# प्रियकराचा महिलेवर ॲसिड हल्ला

## आरोपीला अटक

नालासोपारा : माझी नाही तर कुणाचीच नाही, असे म्हणत एका विवाहित महिलेच्या प्रियकराने विवाहितेवर ॲसिड हल्ला करून दिला. विद्रुप करण्याचा प्रयत्न केल्याची घटना नालासोपाऱ्यात घडली. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून प्रियकर कामरान अन्सारी याला पेल्हार पोलिसांनी अटक केली आहे.

नालासोपारा पूर्व, वाकणपाडा येथे राहणारी विवाहित महिला हिचा घाटकोपर येथे राहणाऱ्या तौफिक इद्रासीबरोबर विवाह झाला होता. त्याच्यापासून एक ४ वर्षांची मुलगी आहे. पण तौफिक तिला सतत मारहाण करत असल्याने तिने त्याला सोडून दिले आणि ती याच परिसरात राहणाऱ्या कामरान अन्सारी याच्या सोबत लिव्ह इन रिलेशनमध्ये राहत होती.

पण कामरानने सुद्धा लग्नाला नकार दिल्याने तिने त्यालासुद्धा सोडून दिले. त्यानंतर ती नालासोपारा येथील कमाल खान याच्या सोबत राहू लागली. याची माहिती पहिला पती तौफिक आणि प्रियकर कामरान यांना समजताच दोघांनी तिच्या सोबत भांडण केले. मात्र, या महिलेने दोघांनाही येण्यास नकार दिला आणि कमालसोबतच राहणार, असे सांगितल्याने संतप्त झालेल्या कामरानने तिच्यावर रात्री कमाल आणि ही महिला झोपली असताना खिडकीतून अंगावर ॲसिड टाकले. यात पीडित महिला जखमी झाली असून, तिसरा प्रियकर कमालही जखमी झाला आहे. तिच्यावर उपचार सुरू असून पेल्हार पोलिसांनी कामरान अन्सारी याला अटक केली आहे.

त्याला शुक्रवारी वसई न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. असे पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत लब्धे यांनी सांगितले.

पुण्यनगरी पा.नं. II

# पाचू बंदरात बोटीसह खलाशी बेपत्ता

## कस्टम, पोलिसांची समुद्रात शोधमोहीम सुरू



**वसई :** वसई, पाचू बंदर येथील एक मच्छीमार बोट व त्यावरील खलाशी बेपत्ता झाल्याने सागरी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कोस्ट गार्ड, पोलीस यंत्रणा यावेळी काय करत होती? असा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान, कस्टम व पोलीस अधिकाऱ्यांनी समुद्रात शोधमोहीम सुरू केली. मात्र, रात्री उशिरापर्यंत बोटीचा आणि खलाशाचा ठावठिकाणा लागला नसल्याचे सांगण्यात आले.

पाचू बंदरातून मच्छीमार बोट अचानक बेपत्ता झाल्याने सर्व शासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. शोधमोहिमेसाठी मत्स्य विभागाने कुठलेच सहकार्य न केल्याने मच्छीमार बांधवांत संतापाचे वातावरण आहे. वसई पोलिसांनी बोट सर्वत्र शोधली असता ती मिळून आली नसल्याने, ती बोट खलाशाने नेली असण्याच्या शक्यतेवरून खलाशाविरोधात बोट चोरीचा गुन्हा दाखल करण्यात येत असल्याचे वसई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्याणराव कर्पे यांनी सांगितले. पीटर पेद्रू डांबर यांच्या मालकीची सावपेद्रू नावाची बोट पाचू बंदर येथे किनाऱ्यावर नांगरून ठेवली होती. त्यावर विकास नावाचा खलाशी झोपला होता. तो आणि बोट गायब असल्याचे मालकाच्या लक्षात आले. यानंतर घडलेला प्रकार मत्स्य विभागाचे सहाय्यक आयुक्त दिनेश पाटील यांना माहिती देऊन सहकार्य मागितले असता, त्यांनी याबाबत असमर्थता दर्शवली. यानंतर वसई युवा बलचे अध्यक्ष व्हेलेंटाईन मिरची यांनी बोट मालकाला आधार देत पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. त्यानंतर तपास सुरू झाला. अधिकाऱ्यांनी समुद्रात प्रत्यक्ष शोधमोहीम राबवली. दुपारी २ वाजता सुरू झालेल्या शोधमोहिमेत वसई पोलिसांचे पथक, कस्टम अधिकारी सहभागी झाले होते. मात्र, रात्री उशिरापर्यंत बोटीचा तपास लागला नव्हता. बोट आणि खलाशी दोघे गायब असल्याने ती बोट त्यानेच चोरून नेली असावी, असा प्राथमिक अंदाज वसई पोलिसांनी वर्तवला आहे.

पुण्यनगरी पु.पा.४.

# वसईत ६ नोव्हेंबरला कायदेविषयक महाशिबीर

**वसई :** वसई पश्चिमेकडील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये तालुका विधीसेवा समितीतर्फे भव्य कायदेविषयक महाशिबिर रविवार, ६ नोव्हेंबर रोजी न्यू इंग्लिश स्कूल व ज्यु. कॉलेज, वसईच्या प्रांगणात होणार आहे. या वेळी विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष जिल्हा तथा न्यायाधीश डॉ. सुधीर देशपांडे यांनी दिली. हे महाशिबीर राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार आणि जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश अभय मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली पार होत असल्याचे न्यायाधीश आर. एस. नाथाणी यांनी सांगितले. महाशिबिरात एका बाजूला विविध शासकीय योजनांची माहिती देणारे स्टॉल्स प्रदर्शित केले जातील. तसेच दुसऱ्या बाजूला नागरिकांसाठी विविध कायद्यांवर न्यायाधीश आणि वकिलांकडून माहितीपर व्याख्यानांची सत्रे ठेवली जातील, अशी माहिती न्यायाधीश जी. जी. कांबळे यांनी दिली. महाशिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकारण, ठाणे सचिव ईश्वर सूर्यवंशी, वसई येथील पोलीस विभाग, जिल्हा परिषद, महानगरपालिका, महसूल विभाग, अंगणवाडी सेवीका, विधी सहाय्यक स्वयंसेवक यांचे सहकार्य लाभले आहे. या शिबिराचे सकाळी १०.०० वा. उद्घाटन होऊन सुरुवात होईल आणि हे शिबीर दुपारी ३.०० वाजेपर्यंत खुले राहील, अशी माहिती कार्यालयीन अधीक्षक जी. एस. हिरवे, डी. पी. नागपुरे, एस. बी. राठोड, वाय. एम. शिरसाळकर या न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी दिली.

पुढारी पु.पा.२.

# वसईमध्ये भ्रष्टाचारविरोधी जनजागृती

**नालासोपारा :** भ्रष्टाचार निर्मूलनासाठी दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन लाचलुचपतविरोधी पथकाने केले असून ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येत असून नालासोपारा येथे रिक्षाचालक, ग्रामस्थ यांची कॉर्नर मीटिंग घेण्यात आली. संबंधितांना एसीबीची कार्यपद्धती पोलिसांनी सांगून जनजागृती केली. वसई परिसरातील विविध कार्यालयात दर्शनी भागावर लाचलुचपत प्रतिबंधकचे स्टिकर चिकटवण्यात आले. पालघर जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक नवनाथ जगताप यांनी केले आहे.

म-टा-५.५.१.

# बेकायदा बांधकामांवर बुलडोझर

**म. टा. वृत्तसेवा, वसई**



वसई-विरार महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामांवरील तोडक कारवाईला चांगलाच वेग आला आहे. मागील दोन दिवसांत पालिकेने नालासोपारा आणि विरारमध्ये कारवाई करून एकूण २४ हजार चौरस फुटांचे बांधकाम जमीनदोस्त केले आहे. यापुढेदेखील कारवाई सुरूच राहणार असल्याचे पालिकेने सांगितले.

**२४ हजार चौरस फुटांचे बांधकाम जमीनदोस्त**

पालिका हद्दीत झालेल्या अनाधिकृत बांधकामांविरोधात दिवाळीनंतर कारवाईचा धडाका हाती घेण्यात आला आहे. पालिकेने नालासोपारा आणि विरार भागात नुकतीच कारवाई करत बेकायदा इमारती जमीनदोस्त केल्या. प्रभाग समिती 'सी'मधील चौधरी वाडी, सहकार नगर, विरार पूर्व या परिसरातील तीन इमारतींचे वरचे दोन मजले व त्याच ठिकाणच्या बांधकाम सुरू असलेल्या चार हजार चौरस फुट क्षेत्रफळाच्या एका रिकाम्या इमारतीचे बांधकाम प्रभाग समिती 'सी' चंदनसारचे प्रभारी सहायक आयुक्त गणेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली निष्कासित करण्यात आले आहे. गोपचरपाडा येथील नाल्यालगत बांधकाम सुरू असलेल्या दोन गाळे व सहा सदनिका असे एकूण अडीच हजार चौ.फुट क्षेत्रफळाच्या दुमजली इमारतीवर बुधवारी कारवाई करण्यात आली. प्रभाग समिती 'जी' वालीव अंतर्गत धुमाळनगर येथे एक हजार ७०० चौ. फुट क्षेत्रफळ असलेल्या अनधिकृत पत्राशेडच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. प्रभाग समिती 'एफ'मधील संतोष भुवन, हवाईपाडा, नालासोपारा पूर्व येथील ५०० चौ.फुट क्षेत्रफळाच्या दोन अनधिकृत गाळ्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

गुरुवारीही कारवाई सुरू ठेवत विरार येथील दोन इमारती जमीनदोस्त केल्या. विरार जीवदानी रोड येथील आनंदी नगर बांधकाम सुरू असलेल्या इमारतीचे तीन हजार ६०० चौरस फुटांचे बांधकाम जमीनदोस्त केले. अन्य एका पाच मजली इमारतीवरही कारवाई करण्यात आली. दोन्ही दिवशी मिळून एकूण २४ हजार चौरस फुटांच्या बांधकामांवर कारवाई केल्याची माहिती उपायुक्त अजित मुठे यांनी दिली. पालिका आयुक्त अनिलकुमार पवार व अतिरिक्त आयुक्त आशीष पाटील यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

पुढारी ५.५.२

# बेपत्ता तीन मुलींचा शोध

**मिरारोड** : अहमदाबाद येथून तीन अल्पवयीन मुलींचे अपहरण झाले होते. त्या मुलींचा मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलिसांच्या गुन्हे शाखा-१ ने तपास करून शोधून काढले असून त्यानंतर त्या मुलींना गुन्हे शाखा अहमदाबाद यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. अहमदाबादच्या कारंजा पोलीस ठाण्यात सोमवारी दुपारच्या सुमारास तीन अल्पवयीन मुलींचे अपहरण झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. अहमदाबादच्या गुन्हे शाखेतल्या पोलिसांनी मीरा-भाईंदर, वसई-विरार गुन्हे शाखा कक्ष १ यांना संपर्क साधून अपहरण झालेल्या मुली या मिरारोड परिसरात असल्याचे सांगितले होते. त्यानुसार वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट १ चे अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून त्या मुलींचा शोध घेतला असता त्या तीन अल्पवयीन मुली या भारती पार्क, मिरारोड परिसरात बुधवारी मिळून आल्या.

पुढारी ५.५.२.

# परिवहन बसच्या धडकेत एकाचा मृत्यू

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड परिसरात मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन सेवा बसची दुचाकीला धडक बसून एका २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दुचाकीवर मागच्या बाजूस बसलेला तरुण किरकोळ जखमी झाला आहे.

मिरारोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत बुधवारी सकाळी १० च्या सुमारास भारत टायर, १५ नंबर बसस्टॉप मिरा रोड पूर्व या ठिकाणी पालिकेच्या परिवहन सेवेच्या बसची समोरून येणाऱ्या दुचाकीला धडक बसल्याने दुचाकीवर मागे बसलेला जोसेफ मैत्री (१८) हा किरकोळ जाखमी झाला, मात्र दुचाकी चालवणारा सुनील मैत्री हा बसच्या पुढील चाकाखाली आल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याच्या नाकातून रक्त येत होते. सुनीलला उपचारासाठी पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, रुग्णालयात डॉक्टरांनी तपासून सुनील मयत झाल्याचे घोषित केले.

लोकसत्ता पु.प.१.

# वाहनतळ नसतानाही दंड आकारणी

## वाहनधारकांना ७०० रुपयांचा आर्थिक भुर्दंड

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई, विरार शहरात वाहने उभी करण्यासाठी पालिकेची वाहनतळ व्यवस्था नसल्याने वाहने उभी करण्यास अडचणी येत आहेत. तर दुसरीकडे वाहतूक विभागाकडून होणाऱ्या कारवाईमुळे ७०० रुपयांचा आर्थिक भुर्दंड नागरिकांना बसू लागला आहे.

वसई, विरार शहरात वाहनांची संख्या बेसुमार वाढली आहे. वाहने उभी करण्यासाठी अधिकृत वाहनतळाची व्यवस्था पालिकेने अजूनही केली नाही, तर दुसरीकडे आवश्यक त्या ठिकाणी नो पार्किंगचे फलक ही लावण्यात आले नाहीत. त्यामुळे अनेकजण रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला, फुटपाथ, रहदारीच्या मार्गात आपली वाहने उभी करीत आहेत. त्यामुळे वाहतुकीस व ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत असतो. अशा वाहनांना आवर घालण्यासाठी वाहतूक विभागाने विविध ठिकाणच्या भागांत कारवाई सुरू केली आहे. विशेषतः दुचाकी वाहने ही टोइंग करून उचलली जात आहेत. या वाहनांवर ७०० रुपये इतका दंड आकारला जात आहे.

पालिकेची कमकुवत वाहतूक सेवा, रिक्षाचालकांची मनमानी, पार्किंग, नो पार्किंग झोन नाही, नागरिकांच्या सोयीसाठी कोट्यवधी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या पेल्हार फाटा ते निर्मळ या मुख्य रस्त्यावरील बेकायदा गॅरेजचे आणि अवैध फेरीवाल्यांचा अतिक्रमण, मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला वर्षानुवर्षे बेकायदा उभी केलेली वाहने, I उड्डाणपुलाखाली दोन्ही बाजूला विरुद्ध दिशेने उभ्या केलेल्या रिक्षा बेकायदा रिक्षा स्टँड या वाहतुकीच्या समस्या निर्माण करणाऱ्या या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करून ही कारवाई नागरिकांना वाहतुकीच्या समस्येपासून मुक्त करण्यासाठी केली जात नसून टोइंग एजन्सी चालवणाऱ्या ठेकेदाराचे दुकान चालवण्यासाठी केली जात आहे, असा प्रश्न वसई विरार भाजप उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी उपस्थित केला आहे. समस्येतून मुक्ती मिळविण्यासाठी पार्किंगची व्यवस्था करावी तसेच रस्त्यावरील फेरीवाले, बेकायदा गॅरेजही हटविण्यात यावे, अशी मागणी बारोट यांनी पत्राद्वारे केली आहे.

## विनापरवाना चित्रीकरणप्रकरणी तीन लाख दंड

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरात पालिकेची परवानगी न घेता चित्रीकरण करणाऱ्या एका मोठ्या चित्रीकरण समूहाला पालिकेने ३ लाख रुपयांचा दंड ठोठावला.

मंगळवारी दुपारी भाईंदर पश्चिमेकडील ३० मीटर रस्त्यावर 'वॉर्ड एंटरटेनमेंट'कडून विनापरवाना चित्रीकरण केल्याची माहिती अनिल नोटियाल यांना मिळाली. त्यामुळे त्यांनी घटनास्थळी जाऊन कॅमेरा जप्त केला. पालिका शहर अभियंता दीपक खांबित यांनी नियमानुसार शुल्काच्या दहा पट दंड आकारला.

लोकसत्ता पु.प. ४

## त्रिवेणी रुग्णालयातील डॉक्टरांचा जबाब

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपाऱ्यातील बाळाचा हात कापल्याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी त्रिवेणी या खासगी रुग्णालयाच्या ३ डॉक्टर आणि एका परिचारिकेचा जबाब नोंदवला. आम्ही उपचारात कोणतीही चूक केली नसल्याचा दावा रुग्णालयाने केला आहे. या प्रकरणी पोलीस शुक्रवारी वाडिया रुग्णालयाच्या डॉक्टरांचा जबाब नोंदविणार आहेत.

नालासोपारा येथे राहणाऱ्या अंजली वाला या महिलेल्या मुलाच्या उजव्या हाताला गँगरीन झाल्याने वाडिया रुग्णालयात शस्त्रक्रिया करून तो कापावा लागला होता. नालासोपारा येथील त्रिवेणी या खासगी रुग्णालयाने चुकीच्या पद्धतीने सलाइन लावल्याने हात निकामी झाल्याचा आरोपी वाला यांनी केला आणि याप्रकरणी तक्रार दिली होती. त्याअनुषंगाने बुधवारी पोलिसांनी वाला यांचा सविस्तर जबाब नोंदवून घेतला होता. तर गुरुवारी त्रिवेणी रुग्णालयातील तीन डॉक्टर आणि परिचारिकेचा जबाब नोंदवला. तसेच उपचारासंदर्भातील सर्व कागदपत्रे जमा केली. बाळाच्या हातात रक्ताच्या गाठी जमा होऊ लागल्याने आम्ही सलाइन दिले तसेच योग्य उपचार केल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. आता गुरुवारी वाडिया रुग्णालयातील डॉक्टरांचा जबाब नोंदवला जाणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी दिली. आम्ही या प्रकरणी सर्व उपचारासंदर्भातील कागदपत्रे मागवली आहेत.

लोकमत पु.प. ४.


## मीरा-भाईंदर आयुक्तालयात घटले चोरीचे गुन्हे

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** मीरा- भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत २०२१ व सप्टेंबर २०२२ पर्यंत जवळपास ११२ चेन चोरीच्या घटना घडल्या आहेत. पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांना चेन चोरांना पकडण्यात यश आल्याने ७५ टक्के चेन चोरीचे गुन्हे घटले आहेत.

मागील नऊ महिन्यांत मीरा रोड, नयानगर, उत्तन पोलीस, मांडवी, वसई ठाण्यात एकही गुन्हा दाखल झालेला नाही. तर काशिमीरा पोलीस ठाणे एक, भाईंदर पोलीस ठाणे एक, नवघर पोलीस ठाणे चार, माणिकपूर, तुळिंज, वालीव पोलीस ठाण्यात एक, आचोळे पाच, विरार सहा, नालासोपारा एक, पेल्हार दोन, अर्नाळा तीन असे गुन्हे दाखल आहेत. तर, २०२१ मध्ये चेन चोरीचे ८६ घडले आहेत. त्यातील ६६ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले होते. मात्र, १ जानेवारी ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत चेन चोरीचे २६ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी १५ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२१ व २०२२ या वर्षात दाखल असणाऱ्या गुन्ह्यांची आकडेवारी पाहता २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये गुन्ह्याचे प्रमाण कमी झाले आहे.

लोकसत्ता ५-११-१०



# शहरात क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक

## अपघातांचा धोका

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** पावसाळा सरताच शहरात विकासकामांनी जोर धरला आहे. त्यामुळे शहरात विविध ठिकाणच्या भागात माती, दगड, खडी यासह इतर साहित्याची वाहनांतून क्षमतेपेक्षा अधिक वाहतूक होऊ लागली आहे. या वाहतुकीमुळे अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

वसईच्या विविध ठिकाणच्या भागात बांधकामे, माती भराव यासह इतर कामे सुरू झाली आहेत. त्यामुळे भरावासाठी लागणारी माती, राडारोडा, बांधकामासाठी लागणारी खडी, रेती, ग्रिड पावडर, दगड, यासह विविध प्रकारच्या माल रस्त्यावरून वाहतूक होण्याचे प्रमाण वाढले आहे. मात्र वाहनात वाहनांच्या क्षमतेपेक्षा अधिक माल भरून व नियमबाह्य पद्धतीने वाहतूक होत असल्याचे चित्र दिसून आले आहे.

अनेक मोठ्या डम्परमध्ये काठोकाठ व त्याहीपेक्षा अधिक माल भरला जात आहे. मातीची वाहतूक करताना ती रस्त्यावर पडणार नाही यांची खबरदारी वाहनचालकांनी घेणे आवश्यक आहे. याशिवाय वाहतूक करताना रेती, माती व ग्रिड पावडर त्यावर झाकण देऊन त्याची वाहतूक करणे बंधनकारक आहे. जेणेकरून त्यातून उडणारे धूलिकण हे इतर प्रवाशांना त्रासदायक ठरणार नाहीत. असे असतानाही सर्रासपणे रस्त्यावर सांडत वाहनचालक घेऊन जातात. काही वेळा वाहतुकीवेळी दगड-माती वाहन ट्रॉलीच्या कडेला लटकत असतात. जर हे दगड-माती वाहनांच्या मागून येणाऱ्या व कडेने जाणाऱ्या वाहनचालकाच्या अंगावर पडल्यास अपघात होण्याची शक्यता आहे. अशी धोकादायक वाहतूक सुरू असतानाही उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून याकडे लक्ष दिले जात नसल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. तसेच काही वाहने तर इतकी भरलेली असतात की चढण असलेल्या रस्त्यावर लोडही घेत नाहीत. तर काही वेळा अतिक्षमतेमुळे ही वाहने मध्येच बंद पडतात. यामुळे वाहतूक कोंडीसारख्या समस्येला नागरिकांना सामोरे जावे लागते. जी वाहने क्षमतेपेक्षा अधिक माल वाहतूक करीत आहेत अशा वाहनांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

### कारवाईसाठी विशेष पथके

मागील अडीच वर्षांत जवळपास तीन हजारांहून अधिक वाहनांची तपासणी करून ८५६ इतक्या वाहनांवर कारवाई केली आहे, तर काही वाहने जप्त केली होती. आता पुन्हा एकदा क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक करीत त्यांच्याविरोधात कारवाईसाठी विशेष पथके तयार करून मोहीम हाती घेतली जाणार आहे. पुढील आठवड्यापासून कारवाईला सुरुवात केली जाईल, असे वसई उपप्रादेशिक परिवहन अधिकारी दशरथ वाघुले यांनी सांगितले आहे.